ePaper
इराणचा इस्रायलच्या ड्रोन कारखान्यावर भीषण हल्ला; इस्रायलचं मोठं नुकसान

वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827



महाईन्यूज ™




फक्त काँक्रीट ओतणे म्हणजे विकास नाही!

WWW.MAHAENEWS.COM | सोमवार,दि. 06 एप्रिल 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## भोंदूबाबा अशोक खरातची पत्नी कल्पना आणि मुलगा हर्षवर्धन दोघेही फरार

# आधी पत्नी फरार, आता मुलगा 'नॉट रिचेबल'!

**महाईन्यूज । नाशिक**

**संपूर्ण महाराष्ट्रात काही दिवसांपासून चर्चेचा विषय झालेल्या नाशिकमधील भोंदू बाबा अशोक खरात प्रकरणात दररोज नव्या घडामोडी घडत आहेत. या प्रकरणाचा तपास करण्यासाठी राज्य शासनाने स्थापन केलेल्या विशेष पथकाकडून (एसआयटी) खरातविरुध्दच्या काळ्या कारनाम्यांविषयी पुरावे गोळा करण्यासह त्याला साथ देणाऱ्यांचीही चौकशी करण्यात येत आहे. असे असले तरी अद्याप या चौकशीची व्याप्ती मर्यादित स्वरुपाची असल्याचा आक्षेप विरोधकांकडून घेतला जात असताना विशेष तपास पथकासाठी धक्कादायक अशी घडामोड नाशिकमध्ये घडली आहे. त्यामुळे अनेक प्रश्न उभे राहत आहेत.**





सिन्नर तालुक्यातील मिरगाव येथील श्री शिवनिका संस्थानचा अध्यक्ष असलेल्या अशोक खरातने अनेक महिलांचे लैंगिक शोषण करण्यासह काही शेतकरी, जमीन मालक, गुंतवणूकदारांनाही फसविले असल्याचे पुढे येत आहे. त्यामुळे हे प्रकरण वेगवेगळे वळण घेत आहे. प्रारंभी केवळ महिलांच्या लैंगिक शोषणाचा मुद्दा असलेल्या प्रकरणात दररोज नवनवीन विषयांची भर पडत आहे. खरातबरोबरच त्याचे नातेवाईक, त्याचे कुटुंबातील सदस्यांची चौकशी करण्यात येत आहे.

शिर्डीतील जमीन फसवणूक प्रकरणात अशोक खरातची पत्नी कल्पना खरातविरुध्दही गुन्हा दाखल असल्याने तिला ताब्यात घेण्यासाठी एसआयटीचे पथक नाशिक येथील त्यांच्या घरी गेले असता ती पथकाच्या हातावर तुरी देत पसार झाली. परंतु, त्याचवेळी खरातचा मुलगा हर्षवर्धन खरात याला एसआयटीने चौकशीसाठी ताब्यात घेतले. एसआयटीकडून त्याची चौकशी करण्यात आली. परंतु, या चौकशी दरम्यान हर्षवर्धन फारच त्रोटक माहिती देत असल्याचे अधिकाऱ्यांच्या लक्षात आले. चौकशी करुन त्यास सोडून देण्यात आले.

एसआयटीकडून हर्षवर्धन खरातला सोडण्यात आले असले तरी गरज भासेल त्यानुसार त्याची पुन्हा चौकशी होणे निश्चित होते. परंतु, नंतर हर्षवर्धन खरातच्या मुलाचा फोनच लागत नसल्याचे आढळून आले. हर्षवर्धन खरातचा मोबाईल बंद असल्याचे आढळून आल्यावर तपास यंत्रणांनी खरातच्या नाशिक येथील निवासस्थानी शोध घेतला असता हर्षवर्धन घरीही नसल्याचे आढळले. त्यामुळे हर्षवर्धन खरात नेमका गेला कुठे, असा प्रश्न उपस्थित होत आहे. हर्षवर्धनचा ठावठिकाणा समजत नसल्याने सर्वांनाच धक्का बसला आहे.

हर्षवर्धन खरात नाशिकमध्येच आहे की, नाशिकबाहेर कुठे गेला, याविषयी तपास सुरु करण्यात आला आहे. हर्षवर्धनने नाशिक शहरातून बाहेर जाण्यापूर्वी पोलीस अधिकाऱ्यांची परवानगी घेणे आवश्यक होते. परंतु, कोणत्याही नियमांचे पालन न करता, अधिकाऱ्यांशी संपर्क न करताच हर्षवर्धन कुठे गेला, याविषयी सर्वांनाच उत्सुकता आहे. हर्षवर्धनचा मोबाईल नॉट रिचेबल असल्याने तो कुठे गेला, तो एकटाच बाहेर गेला की, त्याला कोणाची साथ आहे, हे प्रश्न उपस्थित होत आहेत. विशेष म्हणजे, खरातची पत्नी याआधीच फरार झाली आहे. आता खरातच्या मुलाशीही संपर्क होत नसल्याने नेमके झाले काय, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

## खरातची ईडी चौकशी होणार; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

अशोक खरात प्रकरणाचा तपास सुरू आहे. अशोक खरातच्या संपत्तीची आणि गैरव्यवहारांची चौकशी केली जाईल. अशोक खरात प्रकरणात काही लोक राजकारण करण्याचा प्रयत्न करत आहेत. पण मी स्पष्ट सांगतो की अशा प्रकरणाबाबत सरकारला जे करायला पाहिजे ते सरकार करत आहे. अशोक खरात प्रकरणात आतापर्यंत १२ गुन्हे दाखल झाले आहेत आणि दररोज नवीन माहिती समोर येत आहे. या प्रकरणात एसआयटी रोज काय तपास करते हे रोजच सांगता येणार नाही. पण एसआयटी योग्य वेळी या प्रकरणाबाबत सविस्तर माहिती देईल. त्यामुळे मला वाटतं की सर्वांनी एसआयटीवर विश्वास ठेवावा. एसआयटी उत्तम काम करत आहे. खरात प्रकरणातील व्यवहारांबाबत नक्कीच ईडी चौकशी होणार आहे. त्याबाबत ईडीने या गोष्टीची माहिती घेतली आहे. ईडीनेही त्यांची कारवाई सुरू केलेली आहे. एकदा खरातच्या जमिनी कुठे-कुठे आहेत, याची माहिती समजली की नियमानुसार जे-जे करावं लागेल ते आम्ही करणार आहोत, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं आहे.

## सीडीआर कोणी लीक केला? चौकशी होणार



अशोक खरात प्रकरणातील सीडीआर कोणालाही प्राप्त करून घेण्याचा अधिकार नाही. तो अधिकार फक्त ज्या तपास यंत्रणा आहेत त्यांनाच तो अधिकार आहे. मात्र, या प्रकरणातील सीडीआर कसा लीक झाला? तो सीडीआर कोणी लीक केला? या संदर्भातील चौकशी राज्य सरकार करणार आहे. मला असं वाटतं की अशा प्रकारच्या प्रकरणात फक्त आरोप-प्रत्यारोप करून चालत नाही. ज्यांच्या विरोधात सबळ पुरावा असेल त्यांच्यावर कारवाई होईलच. मात्र, कोण-कोणाशी बोललं या आधारावर आपली क्रिमिनल जस्टिस सिस्टम चालत नाही, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

# काँक्रीट ओतणे म्हणजे विकास नाही!

## पुण्याच्या दुरवस्थेवरून आदित्य ठाकरेंचा भाजप आणि सरकारवर निशाणा

**महाईन्यूज । पुणे**

**पुणे शहर आणि परिसरात गुरुवारी (२ एप्रिल) झालेल्या ढगफुटीसदृश पावसामुळे नागरिकांची मोठी तारांबळ उडाली होती. या पावसाने पुणेकरांची दैना उडवली असून, शहरातील रस्ते जलमय झाल्याने जनजीवन विस्कळीत झाले होते. यावरून आता राजकीय वातावरण तापले असून शिवसेना (उबाठा) नेते आदित्य ठाकरे यांनी सत्ताधारी भाजपा आणि सरकारवर जोरदार टीकास्त्र सोडले आहे.**





गुरुवारी झालेल्या अवघ्या दोन तासांच्या पावसाने पुणे महापालिकेच्या कामांची पोलखोल केली आहे. शहरातील सर्व प्रमुख रस्त्यांवर गुडघाभर पाणी साचले होते. अनेक भागांत दुचाकी आणि चारचाकी वाहने पाण्यात तरंगताना दिसली. वाहतूक पूर्णपणे ठप्प झाल्याने नोकरदार आणि सामान्य नागरिकांचे प्रचंड हाल झाले होते. पायाभूत सुविधांचा पूर्णपणे बोजवारा उडाल्याचे चित्र शहरभर पाहायला मिळाले होते.

पुण्यातील या परिस्थितीला प्रशासकीय अपयश आणि पर्यावरणीय दुर्लक्ष कारणीभूत असल्याचा आरोप आदित्य ठाकरे यांनी केला आहे. सोशल मीडियाद्वारे आपली प्रतिक्रिया देताना त्यांनी 'ट्रिपल इंजिन' सरकारवर निशाणा साधला. "पुण्यातील पाऊस हा काही 'क्लाउडबर्स्ट' नव्हता, तर हे प्रशासनाचे पूर्णतः अपयश आहे. केवळ काँक्रीट ओतणे म्हणजे विकास नाही. गेल्या दशकभरापासून पुण्यात सत्ता असूनही ही अवस्था ओढवली आहे," अशी टीका आदित्य ठाकरे यांनी केली.

### राजकीय आरोप-प्रत्यारोप

पुणे महापालिकेत अनेक वर्षांपासून भाजपाची सत्ता आहे, तसेच स्थानिक आमदार आणि खासदारही भाजपाचे आहेत. त्यामुळे शहरातील या दुरवस्थेला थेट भाजपाच जबाबदार असल्याचा आरोप विरोधकांनी केला आहे. "जर तथाकथित विकास असाच सुरू राहिला, तर पुणेकरांना अशा संकटांना वारंवार सामोरे जावे लागेल," असा इशाराही विरोधकांनी दिला आहे.

### आदित्य ठाकरेंनी उपस्थित केलेले मुद्दे:

**अव्यवहार्य प्रकल्प:** रिव्हरफ्रंट डेव्हलपमेंट, चुकीच्या ठिकाणचे मेट्रो खांब आणि नदीपात्रातील अतिक्रमणे यामुळे पाणी साचत आहे.

**पर्यावरणीय बदल:** नदीच्या 'रेड' आणि 'ब्लू' फ्लड लाईन्समध्ये केलेले बदल शहरासाठी घातक ठरत आहेत.

**टेकडी संवर्धन:** वेताळ टेकडीचा नाशाचा प्रस्ताव आणि मोकळ्या जागांचे नष्ट होणारे संवर्धन याकडे त्यांनी लक्ष वेधले.

**सलीम अली पक्षी उद्यान:** २०२१ मध्ये पुनर्जीवित केलेले हे उद्यान आज पुन्हा ढिगाऱ्यांनी भरले जात असल्याचा संताप त्यांनी व्यक्त केला.

# प्रामाणिक पुणेकरांकडून करभरणीत पुढाकार; 3 दिवसांत १४ कोटींची भर

**महाईन्यूज । पुणे**

**थकबाकीदारांसाठी अभय योजना, दंडमाफी आणि विविध सवलतींची अंमलबजावणी सुरू असताना, प्रामाणिक करदाते मात्र कोणतीही सवलत न मागता वेळेआधी कर भरत असल्याचे चित्र पुन्हा समोर आले आहे. नव्या आर्थिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी मिळालेल्या प्रतिसादातून पुणेकरांची करशिस्त आणि तत्परता अधोरेखित झाली आहे.**




महापालिकेच्या मिळकत कर विभागाने ३१ मार्चच्या मध्यरात्रीनंतर २०२६-२७ या आर्थिक वर्षाची बिले ऑनलाइन उपलब्ध करून दिली. बिले उपलब्ध होताच अवघ्या अडीच तासांत, पहाटे सुमारे २.३० वाजल्यापासून करभरण्यास सुरुवात झाली. पहिल्याच दिवशी उशिरापर्यंत सुमारे चार कोटी रुपयांचा महसूल जमा झाला. एप्रिलच्या पहिल्या तीन दिवसांतच हा आकडा १४ कोटी रुपयांवर पोहोचला आहे.

दरम्यान, मागील आर्थिक वर्षात महापालिकेला मिळकत करातून सुमारे २ हजार ९५० कोटी रुपये उत्पन्न मिळाले. मात्र, ३ हजार २५० कोटी रुपयांचे उद्दिष्ट पूर्ण करण्यात प्रशासनाला अपयश आले. समाविष्ट गावांतील थकबाकी वसुलीबाबत राज्य शासनाचा निर्णय न झाल्याचे कारण पुढे करण्यात आले. या पार्श्वभूमीवर थकबाकीदारांना वारंवार दिल्या जाणाऱ्या सवलतींवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

महापालिकेने १५ नोव्हेंबर ते १५ मार्च या कालावधीत अभय योजना राबवून निवासी व व्यावसायिक मिळकतधारकांना दंडाच्या रकमेत ७५ टक्के सूट दिली होती. या योजनेतून ९८५ कोटी रुपयांची वसुली झाल्याचा दावा करण्यात आला असून, सुमारे १ हजार ७५० कोटी रुपयांची थकबाकीची प्रकरणे निकाली काढण्यात आल्याचे प्रशासनाने म्हटले आहे. तरीही एकूण उद्दिष्ट अपूर्ण राहिले.

याउलट, नियमित कर भरणारे नागरिक कोणत्याही सवलतीशिवाय वेळेआधी कर भरत असल्याचे स्पष्ट झाले आहे. १ एप्रिलच्या पहाटेपासून सुरू झालेल्या करभरणीतून शहराची आर्थिक घडी प्रामाणिक करदात्यांवरच टिकून असल्याचे दिसून आले. थकबाकीदारांसाठी सवलतींचा वर्षाव आणि प्रामाणिक करदात्यांसाठी प्रोत्साहनाचा अभाव, यामुळे नाराजीची भावना अधिक तीव्र होत आहे.

मार्च महिन्यातील सर्वसाधारण सभेत काही नगरसेवकांनी अभय योजना ३१ मार्चपर्यंत वाढवण्याची मागणी केली होती. यावरून थकबाकीदारांना दिलासा देण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे दिसते. मात्र, दुसरीकडे कोणतीही अपेक्षा न ठेवता महसूल देणाऱ्या प्रामाणिक करदात्यांकडे दुर्लक्ष होत असल्याची भावना व्यक्त होत आहे.

महापालिकेकडून ३१ मेपर्यंत कर भरणाऱ्यांना सर्वसाधारण करात १० टक्के सवलत देण्यात येते. या सवलतीचा लाभ घेण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. मात्र, वेळेत कर भरण्याची सवय असलेल्या पुणेकरांसाठी ही सवलत केवळ औपचारिक ठरत असल्याचे चित्र आहे.

एकीकडे थकबाकीदारांसाठी सवलतींची मालिका आणि दुसरीकडे प्रामाणिक करदात्यांची वेळेआधी कर भरण्याची तयारी यातील विरोधाभास अधिक स्पष्ट झाला आहे. प्रशासन आणि लोकप्रतिनिधींची धोरणे नेमकी कोणासाठी, हा प्रश्न पुन्हा एकदा उपस्थित झाला आहे. पुणेकरांनी मात्र कोणतीही सवलत न मागता पहाटेपासून कर भरून आपली जबाबदारी पार पाडत प्रशासनाला अप्रत्यक्षपणे आरसा दाखवला आहे.

# देहूरोडमध्ये २६ लाखांची सोन्याची फसवणूक

## ४० हून अधिक नागरिकांची फसवणूक; ६५७ ग्रॅम सोने आणि रोकड लंपास

**महाईन्यूज ।**
**पिंपरी-चिंचवड**

**देहूरोड परिसरात विश्वासघाताची धक्कादायक घटना उघडकीस आली असून, सोन्याचे दागिने रिपेअरिंग व नवीन दागिने तयार करून देण्याच्या बहाण्याने तब्बल २६ लाख ६० हजार रुपयांची आणि ६५७ ग्रॅम सोन्याची फसवणूक करण्यात आल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी देहूरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**






पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सुभाष चौक, मेन बाजार येथील 'सुंधा ज्वेलर्स' या दुकानात आरोपींनी नागरिकांचा विश्वास संपादन करून त्यांच्याकडून सोन्याचे दागिने दुरुस्तीसाठी तसेच नवीन दागिने तयार करण्यासाठी घेतले. मात्र, ठरलेल्या कालावधीत दागिने व रक्कम परत न देता आरोपींनी दुकान बंद करून पलायन केले.

या प्रकरणात अंबालाल जिवाजी सोनी (वय अंदाजे ५६ वर्षे) व रोहित अंबालाल सोनी (वय अंदाजे ३० वर्षे, दोघे रा. विकासनगर, किवळे, पुणे) यांच्यावर भारतीय न्याय संहिता कलम ३१६ (२), ३१६ (५), ३१८ (४), ३ (५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

विशेष म्हणजे, फिर्यादीसह सुमारे ४० हून अधिक नागरिकांची फसवणूक झाल्याची शक्यता व्यक्त केली जात असून, यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. नागरिकांनी विश्वासाने दिलेले लाखो रुपयांचे सोने आणि रोकड आरोपींनी बळकावल्याने संताप व्यक्त केला जात आहे.

सदर गुन्हा दि. ०१ जानेवारी २०२६ ते ०३ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत घडला असून, दि. ०४ एप्रिल २०२६ रोजी सायं. ३.२० वा. गुन्हा नोंदविण्यात आला आहे. अद्याप आरोपी फरार असून पोलीस त्यांचा शोध घेत आहेत.

या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक डोंगळे करत आहेत.

# ऑनलाईन कर भरण्यास नागरिकांची मोठी पसंती, ६९७ कोटींचा ऑनलाईन भरणा

**महाईन्यूज ।**
**पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाच्या सुलभ, तंत्रज्ञानाधारित उपक्रमांना नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, मालमत्ता कर भरण्यासाठी ऑनलाईन माध्यमाला मोठी पसंती मिळत असल्याची माहिती उपायुक्त सचिन पवार यांनी यावेळी दिली.**



> पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने कर भरणा प्रक्रियेत सुलभता आणि तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर यांना प्राधान्य दिले आहे. नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर ऑनलाईन माध्यमाचा स्वीकार केल्यामुळे घरबसल्या अधिक जलद पद्धतीने कर भरण्याची सुविधा उपलब्ध झाल्याने वेळ व श्रमांची बचत होत आहे.
>
> **- सचिन पवार,**
> **उपायुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

गेल्या आर्थिक वर्षात, १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत एकूण ७ लाख ८७ हजार १८४ मालमत्ताधारकांपैकी ६ लाख ३१ हजार ६१५ मालमत्ताधारकांनी ९६१.७४ कोटी रुपयांचा मालमत्ता कर भरला आहे. यापैकी ५ लाख ११ हजार ६०३ मालमत्ताधारकांनी तब्बल ६९७.१९ कोटी रुपयांचा कर ऑनलाईन माध्यमातून भरत डिजिटल सुविधेचा वापर केला.

महापौर रवि लांडगे, उपमहापौर शर्मिला बाबर, स्थायी समितीचे सभापती अभिषेक बारणे, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या मार्गदर्शनाखाली, तसेच उपायुक्त सचिन पवार यांच्या अधिपत्याखाली 'ऑनलाईन कर भरा' मोहिमेअंतर्गत सवलती, एसएमएस सूचना, सोशल मीडिया मोहिमा तसेच सार्वजनिक घोषणांद्वारे व्यापक जनजागृती करण्यात आली. या प्रयत्नांचा सकारात्मक परिणाम म्हणून नागरिकांनी प्रत्यक्ष कार्यालयात जाण्याऐवजी घरबसल्या ऑनलाईन कर भरण्यास प्राधान्य दिले आहे.

महापालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर नागरिकांना मालमत्तेची माहिती, थकबाकी, सवलतींचा तपशील तसेच कर भरण्याची पावती डाउनलोड करण्याची सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आली आहे.

पिंपरी चिंचवड शहरातील नागरिक डिजिटल साधनांचा प्रभावी वापर करत असून, ऑनलाईन पेमेंट प्रणालीमुळे कर भरणे अधिक सुलभ झाले आहे.

### कर भरणा :

ऑनलाईन : ६९७.१९ कोटी (७२.४९%)
चेक : ११९.१३ कोटी (१२.३९%)
रोख : १०४.८७ कोटी (१०.९०%)
डीडी : ७.०९ कोटी (०.७४%)
समायोजन : ३३.३८ कोटी (३.४७ %)
ईडीसी : ०.०६ कोटी (०.०१%)

# ‘ड्रोन युद्धाचा’ उदय : युद्धाच्या स्वरूपात आमूलाग्र बदल



## भूमिका

**२१ व्या शतकातील संघर्षाचे एक निर्णायक वैशिष्ट्य म्हणून ‘ड्रोन युद्धा’चा उदय झाला असून त्यामुळे लष्करी रणनीती, शस्त्रास्त्र खरेदी आणि रणांगणावरील कार्यपद्धतीत आमूलाग्र बदल झाले आहेत. मानवरहित हवाई वाहने (UAV) आणि सागरी उपकरणांमुळे खोलवर हल्ले, अचूक लक्ष्यभेद आणि ‘रिअल-टाइम’ गुप्तवार्ता संकलन या प्रक्रिया अधिक प्रभावीपणे राबवणे शक्य झाले आहे.**



परिणामी, युद्धाचे स्वरूप पारंपरिक सैन्याच्या थेट संघर्षापासून तंत्रज्ञानाधारित, वेगवान आणि विकेंद्रित मोहिमांकडे झुकत आहे.

विशेषत: युक्रेनमधील संघर्षामुळे ड्रोन तंत्रज्ञानाची व्याप्ती, वेग आणि धोरणात्मक प्रभाव स्पष्टपणे अधोरेखित झाला आहे. युक्रेन आणि इराण हे सामरिक ड्रोन युद्धात अग्रगण्य देश म्हणून उदयास आले आहेत. त्यांनी मोठ्या प्रमाणात कमी किमतीचे ‘फर्स्ट-पर्सन व्ह्यू’ (FPV) ड्रोन तैनात करून दूरवरच्या हल्ल्यांची क्षमता विकसित केली आहे. केवळ काही वर्षांतच, हौशी अभियंते, स्टार्टअप्स आणि 3D-प्रिंटिंग कार्यशाळांचा समावेश असलेल्या नागरी-लष्करी नवोपक्रम परिसंस्थेच्या मदतीने या देशांनी ड्रोन उत्पादन आणि तैनाती हजारोंच्या संख्येपर्यंत वाढवली आहे. त्यामुळे युद्धातील संसाधनांचा वापर अधिक लवचिक आणि खर्चिकदृष्ट्या परिणामकारक बनला आहे.

ड्रोन युद्ध आता केवळ पूरक साधन राहिलेले नाही, तर ते लष्करी आणि राजकीय धोरणाचा मुख्य घटक बनले आहे. युक्रेन, रशिया, इराण, नाटो आणि चीन यांसारख्या देशांमध्ये मानवरहित प्रणाली संघर्षाचे भविष्य घडवत आहेत. मात्र निर्णायक बाब केवळ ही उपकरणे कोणाकडे आहेत हा नसून, कोण त्यांचा मोठ्या प्रमाणावर प्रभावी वापर करू शकते आणि स्वायत्त, कमी खर्चाच्या हवाई धोक्यांना तोंड देण्यासाठी सक्षम संरक्षण व्यवस्था उभारू शकते ही आहे. या बदलामुळे युद्धाची दिशा ‘मोठ्या सैन्यां’पासून ‘मोठ्या प्रमाणातील तंत्रज्ञान’कडे वळत असल्याचे दिसून येते.

युक्रेनच्या रणांगणावरील अनुभवांवरून स्पष्ट होते की ड्रोन भूभागाचे नियंत्रण, शत्रूची क्षमता कमी करणे आणि कारवाईची व्याप्ती वाढवणे यासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरले आहेत. विशेषत: पुरवठ्याची कमतरता किंवा इलेक्ट्रॉनिक हस्तक्षेपाचा सामना करताना वेगाने नवनवीन उपाय शोधण्याची क्षमता ही रणांगणावरील यशाची गुरुकिल्ली ठरत आहे. त्यामुळे केवळ ड्रोन खरेदी करणे पुरेसे नसून उत्पादन पायाभूत सुविधा, कुशल मनुष्यबळ आणि नागरी-लष्करी संशोधन व विकास भागीदारी यांमध्ये गुंतवणूक करणे तितकेच आवश्यक बनले आहे.

तथापि, ड्रोन तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापरामुळे काही गंभीर धोकेही निर्माण झाले आहेत. ड्रोनचे थवे (SWARM), स्वयंचलित दिशादर्शन आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आधारित लक्ष्यीकरण प्रणाली यामुळे संघर्षाची अनपेक्षित वाढ, लक्ष्य निश्चितीतील चुका आणि नागरी पायाभूत सुविधांची वाढलेली असुरक्षितता यांसारख्या समस्या निर्माण होऊ शकतात. भविष्यात ही उपकरणे अधिक स्वायत्त आणि सक्षम होत गेल्यास आंतरराष्ट्रीय नियम, नैतिक मानके आणि मजबूत ‘आदेश व नियंत्रण’ सुरक्षा यंत्रणा विकसित करणे अत्यावश्यक ठरेल.

लष्करी इतिहासात अनेकदा एखादी शस्त्रप्रणाली संपूर्ण युद्धयुगाचे प्रतीक बनते. एकेकाळी अमेरिकेच्या ‘एमक्यू-१ प्रेडेटर’ आणि त्यानंतरच्या ‘रीपर’ ड्रोनने दहशतवादविरोधी युद्धाचे स्वरूप बदलले होते. आज त्याचप्रमाणे कमी किमतीचे, मोठ्या प्रमाणावर उपलब्ध ड्रोन युद्धाच्या नव्या युगाचे प्रतीक बनत आहेत. विशेष म्हणजे, हे तंत्रज्ञान आता केवळ महासत्तांच्या नियंत्रणात राहिलेले नसून लहान राष्ट्रे आणि बंडखोर गटही त्याचा प्रभावी वापर करू लागले आहेत.

एकूणच, ड्रोन युद्ध केवळ आजच्या संघर्षांचे निकाल ठरवत नाही, तर भविष्यातील युद्धाचे स्वरूपही निश्चित करीत आहे. जे देश या क्षेत्रात तांत्रिक, धोरणात्मक आणि नैतिकदृष्ट्या नेतृत्व करतील, तेच पुढील पिढीच्या जागतिक सुरक्षा व्यवस्थेला आकार देतील.

## प्रासंगिक »

### असत्य !

**एका प्रख्यात वकिलाकडे एक गरीब शेतकरी गेला. त्याची केस साधीच होती. त्यातून सुटायचे होते. पण साक्षी-पुरावे, उलट-तपासणीत त्याला बोलता आले नसते.**

गरीब, अशिक्षित शेतकरी होता तो. वकिलाने यावर तोडगा काढला. तो शेतकऱ्याला म्हणाला, "दादा ! घाबरू नका. मी सांगेन तसं करा. मी सोडवतो तुम्हाला यातून." शेतकरी खुश झाला. त्याला वकिलाने सांगितले की, 'कोणत्याही प्रश्नाला उत्तर देऊ नका. त्याऐवजी फक्त बें _S_ बे __S_ असं ओरडा.' साक्षीच्या वेळी शेतकऱ्याने तसे केले. तेव्हा वकील म्हणाला, "हा शेतकरी अशिक्षित आहे आणि थोडा वेडाही आहे." अशा प्रकारे युक्तिवाद करून त्याने ती केस जिंकली. शेतकरी खुश होऊन घरी घरी जाऊ लागला. तेव्हा वकील म्हणाला, "दादा ! तुमची केस जिंकली. नुकसंभारपाईसुद्धा मिळाली. आता माझी फी द्या." शेतकऱ्याने वकिलांकडे रोखून पाहत उत्तर दिले. "बें _S_ बें" वकिलाच्या खोटेपणाचा उपाय त्याच्यावरच उलटला.

- तात्पर्य:

**असत्य असे माणसावर या ना त्या रूपाने उलटले. म्हणून सत्याने वागावे.**

ज्येष्ठ नेते अजित पवार यांच्या पश्चात पक्ष सावरण्याची जबाबदारी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या खांद्यावर आली आहे. या पार्श्वभूमीवर त्यांनी पुत्र पार्थ पवार यांना राज्यसभेवर पाठवण्याचा घेतलेला निर्णय आणि प्रफुल्ल पटेल व सुनील तटकरे यांच्याबाबत ‘मार्गदर्शक’ अशी भूमिका व्यक्त केल्याने राज्याच्या राजकारणात नव्या चर्चांना सुरुवात झाली आहे.

# पटेल-तटकरे ‘मार्गदर्शक मंडळात’?

विशेषत: या ज्येष्ठ नेत्यांना ‘मार्गदर्शक मंडळात’ पाठवले जाणार का, असा प्रश्न पक्षांतर्गत उपस्थित होत आहे. अजित पवार यांनी आपल्या हयातीत सुनेत्रा पवार यांना राज्यसभेवर पाठवण्यामागे केवळ कौटुंबिक सत्तासंतुलन नव्हते, तर दिल्लीत पक्षाचे प्रतिनिधित्व विश्वासू व्यक्तीकडे राहावे, हा त्यामागील दूरदृष्टीचा भाग होता. पक्षाची सूत्रे आपल्या नियंत्रणात राहावीत आणि बाह्य दबावाखाली निर्णय होऊ नयेत, यासाठी त्यांनी ही रणनीती आखली होती. आता त्याच धर्तीवर सुनेत्रा पवार यांनी पार्थ पवार यांना राज्यसभेत पाठवून दिल्लीतील उपस्थिती मजबूत करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे ‘पार्थ पर्व’ सुरू झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे.

नुकत्याच घडलेल्या घटनांनी पक्षातील सुप्त तणाव अधिक स्पष्टपणे समोर आला आहे. पार्थ पवार यांनी प्रफुल्ल पटेल आणि सुनील


प्रफुल्ल पटेल   सुनील तटकरे

तटकरे यांची घेतलेली भेट, तसेच त्यानंतर केलेले वक्तव्य हे केवळ औपचारिक नसून, त्यातून पक्षातील शक्तिसंतुलनाचा संदेश दिला गेला, असे मानले जात आहे. त्यांनी या ज्येष्ठ नेत्यांच्या निष्ठेचा गौरव केला असला, तरी त्यांना ‘मार्गदर्शक’ म्हणून संबोधणे हे त्यांच्या सक्रिय राजकीय भूमिकेतील संभाव्य बदलाचे संकेत मानले जात आहेत.

दुसरीकडे, सुनेत्रा पवार यांनी निवडणूक आयोगाला लिहिलेल्या पत्रात स्वत:ला ‘राष्ट्रीय अध्यक्ष’ म्हणून स्पष्ट उल्लेख केला आणि काही पदांचा उल्लेख टाळला, यामुळे पक्षातील अधिकारसमीकरणांवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या निर्णयामुळे पटेल-तटकरे यांचे अधिकार मर्यादित होण्याची शक्यता व्यक्त केली जात असून, त्यामुळे पक्षातील अंतर्गत संघर्ष अधिक तीव्र होण्याची चिन्हे दिसत आहेत.

याचवेळी बाह्य राजकीय दबावही वाढत आहे. भाजपकडून आमदारांना आपल्या गटात खेचण्याचे प्रयत्न सुरू असल्याची चर्चा आहे, तर दुसरीकडे विरोधी गटाकडून विलीनीकरणाची मागणीही जोर धरत आहे. अशा परिस्थितीत पक्ष एकसंघ ठेवणे, संघटन मजबूत करणे आणि नेतृत्वावर विश्वास निर्माण करणे हे सुनेत्रा पवार यांच्यासमोरचे सर्वात मोठे आव्हान आहे.

एकूणच, पटेल आणि तटकरे यांना ‘मार्गदर्शक मंडळात’ पाठवण्याची चर्चा ही केवळ पदांतराची बाब नसून, ती पक्षातील नव्या नेतृत्वशैलीची आणि सत्तासंतुलनातील बदलाची चाहूल आहे. आगामी काळात सुनेत्रा पवार यांच्या निर्णयक्षमतेवर आणि संघटन कौशल्यावर पक्षाचे भविष्य मोठ्या प्रमाणात अवलंबून राहणार आहे.

## ।। अभंगवाणी ।।



विश्वाचा तो गुरु ।
स्वामी निवृत्ति दातारु ॥१॥

आदिनाथापासून ।
परंपरा आली जाण ॥२॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# मंत्रालयातील कक्ष अधिकाऱ्याला लाच घेताना अटक

## विकासकामांसाठी शासकीय निधी मंजूर करण्याच्या बदल्यात लाच मागितली

**महाईन्यूज** । पनवेल

**शासकीय निधी मंजूर करून देण्यासाठी तब्बल ६ लाख ३७ हजार रुपयांची लाच मागणाऱ्या मंत्रालयातील कक्ष अधिकाऱ्याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात पकडल्याची धक्कादायक घटना खारघर येथे उघडकीस आली आहे. या कारवाईमुळे मंत्रालयातील कारभारावर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.**



या प्रकरणातील आरोपी लोकसेवक विलास ज्ञानोबा लाड कक्ष अधिकारी, वर्ग १, मंत्रालय, मुंबई याने गावातील मूलभूत सुविधांच्या विकासासाठी मंजूर होणाऱ्या शासकीय निधीसाठी तक्रारदाराकडे मोठी रक्कम लाचेची मागणी केली होती. संबंधित गावाच्या सरपंचांनी तक्रारदाराला अधिकारपत्र देऊन निधी मंजुरीसाठी पाठपुरावा करण्याची जबाबदारी दिली होती. त्यानुसार तक्रारदार मंत्रालयात वारंवार पाठपुरावा करत होते.

दरम्यान, २५/१५ योजना व अल्पसंख्याक योजनेअंतर्गत निधी मंजूर करून देण्यासाठी आरोपी अधिकाऱ्याने तक्रारदाराकडे थेट ६ लाख ३७ हजार रुपयांची लाच मागितल्याचे समोर आले. ही रक्कम देण्यास तक्रारदाराने नकार देत ९ मार्च २०२६ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या मुंबई कार्यालयात तक्रार दाखल केली. तक्रारीची दखल घेत विभागाने १६ मार्च रोजी पडताळणी केली असता, आरोपी अधिकाऱ्याने लाच मागितल्याचे स्पष्ट झाले. तसेच ही रक्कम स्वीकारण्यासही तो तयार असल्याचे निष्पन्न झाले. यानंतर सापळा रचण्याचा निर्णय घेण्यात आला.

५ एप्रिल २०२६ रोजी खारघर, खारघर येथे सापळा राबवण्यात आला. ठरल्याप्रमाणे तक्रारदाराने आरोपीला ६.३७ लाख रुपयांची रक्कम दिली असता, लाड याने ती स्वीकारताच लाचलुचपत प्रतिबंधक विभाग मुंबई च्या पथकाने त्याला रंगेहात पकडले. या कारवाईमुळे परिसरात एकच खळबळ उडाली. ही कारवाई पोलीस निरीक्षक प्रमोद सुर्वे यांनी केले, तर पोलीस निरीक्षक सागर आरगडे यांनी पर्यवेक्षणाची जबाबदारी पार पाडली. तसेच सहाय्यक पोलीस आयुक्त अजित मुळे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई पार पडली.

मंत्रालयातील अर्थ व नियोजन विभागात कार्यरत कक्ष अधिकारी विलास ज्ञानोबा लाड यांना ६ लाख ३७ हजार रुपयांची लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने खारघर येथे रंगेहाथ पकडले. शासकीय निधी मंजूर करून देण्याच्या मोबदल्यात ही लाच मागितल्याचे निष्पन्न झाल्याने ही कारवाई करण्यात आली असून, या घटनेमुळे मंत्रालयातील भ्रष्टाचार पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

लाड हे मंत्रालयात वर्ग-१ कक्ष अधिकारी म्हणून कार्यरत असून, तक्रारदाराच्या गावातील मूलभूत सुविधा विकास कामांसाठी २५/१५ व अल्पसंख्याक योजनेंतर्गत शासकीय निधी मंजूर करून देण्यासाठी त्यांनी ६,३७,००० रुपयांची लाच मागितली होती. संबंधित गावाच्या सरपंचांनी तक्रारदाराला अधिकारपत्र दिल्याने तो निधी मंजुरीसाठी मंत्रालयात वारंवार ये-जा करत होता.तक्रारदाराला लाच देण्याची इच्छा नसल्याने त्याने ९ मार्च रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली.

त्यानंतर १६ मार्च रोजी पडताळणी करण्यात आली असता लाड यांनी लाच मागितल्याचे स्पष्ट झाले. यानुसार रविवारी रोजी खारघर येथे सापळा रचण्यात आला. या कारवाईदरम्यान लाड यांना तक्रारदाराकडून ६,३७,००० रुपयांची लाच स्वीकारताना पकडण्यात आले.या प्रकरणी भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ च्या कलम ७ अंतर्गत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. ही कारवाई पोलीस निरीक्षक प्रमोद सुर्वे यांच्या पथकाने, पर्यवेक्षक अधिकारी सागर आरगडे यांच्या मार्गदर्शनाखाली केली. दरम्यान, फेब्रुवारी महिन्यात मंत्रालयातील अन्न व औषध प्रशासन विभागातील लिपीकाच्या लाच प्रकरणानंतर पुन्हा एकदा मंत्रालयातील अधिकाऱ्यावर कारवाई झाल्याने प्रशासनातील भ्रष्टाचाराविरोधात कठोर भूमिका घेतली जात असल्याची चर्चा आहे. मागील वर्षीही सिडको डळातील लाचखोरीवर पोलिसांनी कारवाई केली.

# सीडीआर लीकची चौकशी होणार; 'ईडी'चा फास आवळणार

**महाईन्यूज** । मुंबई

**अशोक खरात प्रकरणातील सीडीआर लीकची चौकशी केली जाईल. ईडी खरात याच्या मालमत्तेचीही चौकशी करणार आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज पत्रकारांसोबत संवाद साधताना दिली. ते आज नाशिकमध्ये बोलत होते. फडणवीस म्हणाले की, असे कॉल डेटा रेकॉर्ड मिळवण्याचा अधिकार कोणालाही नाही. सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांच्या दाव्याला उत्तर देताना त्यांनी हे विधान केले. दमानिया यांनी खरात आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यातील संभाषणांचा खुलासा केला होता. त्यांना एका अज्ञात नंबरवरून व्हॉट्सअॅपवर खरातचा सीडीआर मिळाल्याचा त्यांनी दावा केला.**



### एसआयटीवर लोकांचा विश्वास - मुख्यमंत्री

सीएम फडणवीस म्हणाले, ईडीने या प्रकरणाची दखल घेतली असून कारवाई सुरू केली आहे. खरातची सर्व खाती आमच्या निदर्शनास आली असून त्याद्वारे झालेले व्यवहार ओळखण्यात आले आहेत. सर्व बेकायदेशीर मालमत्ता आणि गैरप्रकार उघडकीस येतील, असा त्यांना विश्वास आहे. विशेष तपास पथकाच्या तपासावर आनंद व्यक्त करताना मुख्यमंत्री म्हणाले की, खरातबद्दल माहिती देण्यासाठी मोठ्या संख्येने लोक पुढे येत आहेत. याचे कारण म्हणजे लोकांचा विश्वास वाढत आहे. आतापर्यंत सुमारे १२ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. लोकांनी एसआयटीवर विश्वास ठेवावा, एसआयटी उत्तम काम करत आहे, असेही फडणवीस म्हणाले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, अशोक खरात प्रकरणातील सीडीआर लीकची चौकशी केली जाईल आणि कठोर कारवाई केली जाईल. कॉल डेटा रेकॉर्ड मिळवण्याचा अधिकार कोणालाही नाही. केवळ अधिकृत एजन्सीच ते मिळवू शकतात. हा डेटा कसा आणि कोणाकडून लीक झाला, याची राज्य सरकार चौकशी करेल, असेही ते म्हणाले. संवेदनशील प्रकरणांमध्ये केवळ तक्रारी पुरेशा नसतात. ठोस पुराव्यांच्या आधारे कारवाई केली जाईल. मुख्यमंत्र्यांनी असेही सांगितले की, ईडी अशोक खरातच्या पूर्वीच्या मालमत्तेच्या नोंदींची चौकशी करेल. एका महिलेवर तीन वर्षे बलात्कार केल्याच्या आरोपाखाली खरातला १८ मार्च रोजी अटक करण्यात आली होती. त्यानंतरच्या तपासात लैंगिक अत्याचार आणि जमीन व इतर मालमत्तेशी संबंधित आर्थिक अनियमितता यासह अनेक गुन्हे उघडकीस आले. फडणवीस पुढे म्हणाले की, संवेदनशील प्रकरणांमध्ये केवळ आरोप किंवा तक्रारी पुरेशा नसतात. ठोस पुरावे आणि तपासाच्या आधारेच कारवाई केली जाईल. दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचा इशाराही त्यांनी दिला.

अंमलबजावणी संचालनालय (ED) देखील अशोक खरातच्या मालमत्तेची चौकशी करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. खरातच्या पूर्वीच्या आर्थिक व्यवहारांची आणि मालमत्तेच्या नोंदींची छाननी करण्यात येणार आहे.

# होर्मुझ ठप्प तरीही नो टेन्शन!

## सरकारचा 'थार प्लॅन' करतोय काम; भारतात दररोज विक्रमी तेल उत्पादन

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**अमेरिका इराण युद्धात स्ट्रेट होर्मुझ ठप्प झाल्याने जगात तेल आणि गॅसचं संकट उभे राहिले. पाकिस्तान, बांगलादेशसह व्हिएतनाम, ब्रिटनपर्यंत याचा परिणाम पाहायला मिळाला. भारतातही या युद्धाचे पडसाद जाणवले. परंतु सरकारने होर्मुझमुळे निर्माण झालेले टेन्शन दूर करण्यासाठी थार प्लॅन सक्रीय केला. होर्मुझ बंद झाल्यानं तेल पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी भारताने राजस्थानच्या थार वाळवंटाकडे मोर्चा वळवला आणि तेथील तेल क्षेत्रांमधून कच्च्या तेलाचे उत्पादन वाढवण्यावर भर दिला.**



पश्चिम आशियातील तणावामुळे पुरवठ्यात निर्माण झालेल्या अनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवर सरकारी मालकीच्या ऑइल इंडिया लिमिटेडने राजस्थानच्या थार वाळवंटातील आपल्या तेलक्षेत्रांमधून कच्च्या तेलाच्या उत्पादनात लक्षणीय वाढ केली आहे. पीटीआयच्या रिपोर्टनुसार, जोधपूर सँडस्टोन फॉर्मेशनमधून आता दररोज विक्रमी १,२०२ बॅरल कच्च्या तेलाचे उत्पादन होत आहे. गेल्या वर्षी येथील कच्च्या तेलाचे उत्पादन दररोज ७०५ बॅरल होते. जागतिक तेल संकटाच्या काळात गेल्या वर्षीच्या तुलनेत हे उत्पादन अंदाजे ७०% अधिक आहे.

ऑइल इंडिया जैसलमेरमधील बागेवाला तेल क्षेत्रातून कच्चे तेल टँकरद्वारे गुजरातच्या मेहसाणा येथील ऑइल अँड नॅचरल गॅस कॉर्पोरेशनच्या (ONGC) प्रकल्पांपर्यंत पोहोचवते. तेथून हे कच्चे तेल पाइपलाइनद्वारे इंडियन ऑइल कॉर्पोरेशनद्वारे चालवल्या जाणाऱ्या कोयाली रिफायनरीपर्यंत पोहोचवले जाते. आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये ऑइल इंडियाने राजस्थानमधील तेल क्षेत्रातून ४३,७७३ मेट्रिक टन कच्च्या तेलाचे उत्पादन केले. जे मागील वर्षीच्या ३२,७८७ मेट्रिक टनांपेक्षा जास्त आहे. कच्च्या तेलाच्या उत्पादनातील ही वाढ अशा वेळी झाली आहे जेव्हा इराणने होर्मुझची सामुद्रधुनी बंद करून भारतासह प्रमुख आशियाई बाजारपेठांना होणारा तेल पुरवठा रोखला आहे. तेल पुरवठा कायम ठेवण्यासाठी सरकार उपाययोजना करत आहे. रिफायनरी पूर्ण क्षमतेने कार्यरत आहेत. कच्च्या तेलाचा साठा बऱ्यापैकी आहे. देशभरात पेट्रोल पंपावर पेट्रोल डिझेल पुरवठा सुरळीत आहे असं पेट्रोलियम मंत्रालयाने सांगितले. यामुळे भारताने ऊर्जा स्वावलंबनाच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल टाकत जागतिक संकटाच्या काळातही देशांतर्गत पुरवठा सुरक्षित ठेवण्याची क्षमता सिद्ध केली आहे.

### १९९१ साली तेल क्षेत्राचा शोध

बिकानेर-नागौर उपखोऱ्यात स्थित असलेले बागेवाला तेलक्षेत्र, हे भारतातील काही मोजक्या किनारपट्टीवरील तेलक्षेत्रांपैकी एक आहे. ऑइल इंडियाने १९ विहिरींमध्ये सीएसएस (CSS) कार्य पूर्ण केले, जे मागील वर्षाच्या तुलनेत सुमारे ७२% वाढ आहे. तसेच मागील नऊ विहिरींच्या तुलनेत १३ नवीन विहिरींचे खोदकामही केले. १९९१ मध्ये शोध लागलेले आणि २००.२६ चौरस किलोमीटर क्षेत्रात पसरलेल्या थार तेलक्षेत्रात ५२ विहिरी असून त्यापैकी ३३ कार्यरत आहेत. ऑइल इंडियाने २०१८ मध्ये सर्वात आधी CSS तंत्रज्ञानाच्या प्रायोगिक चाचण्या घेतल्या. ज्यामुळे तेल क्षेत्रातून मोठ्या प्रमाणावर तेल काढणे शक्य झाले. मात्र येथील कच्च्या तेलाच्या जास्त चिकटपणामुळे कंपनीने उत्पादन कायम ठेवण्यासाठी डायल्यूएंट इंजेक्शन व आर्टिफिशियल लिफ्ट सिस्टीम यांसारख्या तंत्रज्ञानाचा अवलंब केला आणि २०१७ पासून बागेवाला क्षेत्रातून कच्च्या तेलाचे उत्पादन सुरू आहे.

## इराणचा इस्रायलच्या ड्रोन कारखान्यावर भीषण हल्ला; इस्रायलचं मोठं नुकसान

**महाईन्यूज । इस्रायल**

**अमेरिका, इस्रायल आणि इराण यांच्यात सुरू असलेल्या भीषण संघर्षाला आता जवळपास एक महिना उलटला असून, परिस्थिती दिवसेंदिवस अधिकच गंभीर बनताना दिसत आहे. या युद्धात सर्वाधिक फटका इराणला बसला असल्याचं मानलं जात आहे. इराणमधील काही प्रभावशाली नेते आणि अनेक वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांचा मृत्यू झाल्याच्या बातम्या समोर आल्या आहेत. तरीदेखील, इराणने कोणतीही माघार घेतलेली नसून उलट प्रतिकार अधिक तीव्र केला आहे.**



अमेरिकाचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला सातत्याने इशारे आणि धमक्या देण्याचा सूर कायम ठेवला आहे. त्यामुळे युद्धविरामाच्या चर्चा सुरू असतानाही तणाव काही कमी होताना दिसत नाही. आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक देश या संघर्षाकडे चिंतेने पाहत आहेत. युद्धविरामासाठी प्रयत्न सुरू असले तरी प्रत्यक्षात परिस्थिती अजूनही धोकादायकच आहे.

या पार्श्वभूमीवर इराणने नुकताच एक मोठा दावा केला होता. त्यांनी अमेरिकेची दोन लढाऊ विमाने पाडल्याचा दावा करत आंतरराष्ट्रीय स्तरावर खळबळ उडवली होती. या दाव्याची स्वतंत्र पडताळणी अद्याप झालेली नसली तरी या विधानामुळे संघर्ष अधिक तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

यातच आता इराणने इस्रायलमध्ये मोठा हल्ला केल्याची माहिती समोर आली आहे. इस्रायलमधील पेटाह टिकवा या भागात असलेल्या ड्रोन निर्मिती कारखान्यावर इराणने क्षेपणास्त्र हल्ला केला असल्याचं वृत्त आहे. या भीषण हल्ल्यामुळे संबंधित कारखान्याचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे. घटनास्थळी मोठमोठे खड्डे पडल्याचंही समोर आलं आहे, ज्यावरून हल्ल्याची तीव्रता स्पष्ट होते.

वृत्तसंस्था 'वायनेट न्यूज'च्या माहितीनुसार, या हल्ल्यामुळे कारखान्याचं कामकाज पूर्णपणे ठप्प झालं आहे. कंपनीच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, नुकसान इतकं मोठं आहे की त्या ठिकाणी पुन्हा काम सुरू करणं लवकर शक्य होणार नाही. अनेक यंत्रणा पूर्णपणे उद्ध्वस्त झाल्या असून पुनर्बांधणीसाठी मोठा कालावधी लागण्याची शक्यता आहे. काही अधिकाऱ्यांनी तर हा कारखाना पूर्णतः नष्ट झाल्याचंही म्हटलं आहे.

या घटनेमुळे इस्रायलच्या संरक्षण उत्पादनावर मोठा परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. ड्रोन तंत्रज्ञान हे आधुनिक युद्धातील अत्यंत महत्त्वाचं साधन मानलं जात असल्याने या कारखान्यावर झालेला हल्ला इस्रायलसाठी मोठा धक्का मानला जात आहे. त्यामुळे भविष्यातील लष्करी कारवायांवरही त्याचा परिणाम होऊ शकतो. एकूणच, या युद्धामुळे मध्यपूर्वेतील तणाव शिगेला पोहोचला असून परिस्थिती नियंत्रणाबाहेर जाण्याची भीती व्यक्त केली जात आहे. युद्धविराम होणार की संघर्ष आणखी भडकणार, याबाबत अजूनही अनिश्चितता कायम आहे. जगभरातील देश आणि आंतरराष्ट्रीय संस्था शांततेचं आवाहन करत असताना प्रत्यक्षात मात्र युद्धाचे ढग अधिकच गडद होताना दिसत आहेत.

# 'धुरंधर' नंतर रणवीरचा 'प्रलय' अवतार!



बॉलिवूड अभिनेता रणवीर सिंग याने 'धुरंधर' आणि 'धुरंधर 2' या सिनेमात केलेल्या कामामुळे त्याची लोकप्रियता खूप वाढली आहे. या दोन्ही सिनेमांच्या प्रचंड यशानंतर आता तो नव्या आणि अधिक भयानक अवतारात प्रेक्षकांसमोर येणार आहे. आगामी काळात तो अनेक सिनेमांमध्ये दिसणार असला तरी, 'प्रलय'हा सिनेमा रणवीरच्या आतापर्यंतच्या प्रोजेक्ट्सपैकी सर्वात वेगळा आणि मोठा मानला जात आहे. सुरुवातीला या सिनेमाची कथा पोर्तुगीज कादंबरी 'ब्लाइंडनेस'वर आधारित असल्याच्या चर्चा रंगल्या होत्या. मात्र, प्रसिद्ध दिग्दर्शक-निर्माते हंसल मेहता यांनी या अफवा फेटाळून लावत स्पष्ट केले की, 'प्रलय' ही पूर्णपणे मूळ कथा आहे. ही कथा जय मेहता आणि विशाल कपूर यांनी लिहिली आहे. हंसल मेहता यांनी सांगितले की, जय मेहता या कल्पनेवर बऱ्याच काळापासून काम करत होता. रणवीर सिंगला ही संकल्पना खूप आवडल्याने त्याने स्वतः पुढाकार घेत या प्रोजेक्टमध्ये गुंतवणूक केली आणि सिनेमाच्या विश्वनिर्मितीतही सक्रिय सहभाग घेतला. या सिनेमात रणवीरसोबत साऊथ सिनेमा इंडस्ट्रीतील आघाडीची अभिनेत्री कल्याणी प्रियदर्शन मुख्य भूमिकेत झळकणार आहे. 'लोकाह' सिनेमाच्या यशानंतर ती सध्या चर्चेत आहे. 'प्रलय'चे दिग्दर्शन जय मेहता करत असून, त्याने यापूर्वी 'स्कॅम 1992 : द हर्षद मेहता स्टोरी' या गाजलेल्या वेबसिरीजचे सह-दिग्दर्शन केले आहे. या वेबसिरीजची निर्मिती 'ट्रू स्टोरी फिल्म्स' आणि रणवीर सिंगच्या 'मा कसम फिल्म्स'या बॅनरखाली होत आहे. प्रलय सिनेमाचे अंदाजित 300 कोटी रुपयांचे बजेट असून चित्रीकरणाला 2026 च्या मध्यापासून सुरुवात करण्यात येणार आहे. तर सिनेमा 2027 मध्ये प्रदर्शित होण्याची शक्यता आहे.

## सोहा कॉफीऐवजी घेते पेय

अलीकडे अनेक कलाकार मंडळी फिट राहण्यासाठी जिम, योगा किंवा विविध प्रकारचे व्यायाम करतात. याबद्दलची अपडेट ते आपल्या चाहत्यांना देत असतात. तसेच फिट राहण्यासाठी लागणाऱ्या डाएटद्दलची माहितीसुद्धा कलाकार आपल्या सोशल मीडियाद्वारे शेअर करताना दिसतात. अशीच फिटनेसबद्दलची माहिती देणारी अभिनेत्री म्हणजे सोहा अली खान. सोहा अली खान सोशल मीडियावर कायमच सक्रीय असते. सोशल मीडियावर ती तिचे स्टायलिश फोटो-व्हिडीओ शेअर करण्याबरोबरचे फिटनेसबद्दल माहितीपर व्हिडीओसुद्धा शेअर करत असते. अशातच अभिनेत्रीने सकाळी आरोग्यासाठी फायदेशीर अशा घरगुती पेयाचा व्हिडीओ शेअर केला आहे. सोहाने तिच्या सोशल मीडियाद्वारे व्हिडीओ शेअर केला आहे. शरीरात होणाऱ्या हार्मोनल बदलांच्या काळात दिवसाची सुरुवात शांत पद्धतीने करणं खूप महत्त्वाचं आहे, हे या व्हिडीओतून तिने सांगितले आहे. तसेच हे पेय कसं बनवायचं, याची रेसिपीसुद्धा तिने शेअर केली आहे. व्हिडीओ शेअर करत सोहा म्हणते, "मी कधीच सकाळी लवकर उठणारी व्यक्ती नव्हते. 'कॉफी पिल्याशिवाय माझ्याशी बोलू नका', अशा स्वभावाची मी होते.



## रश्मिकाचं चाहत्यांना मोठं सरप्राईज!

दाक्षिणात्य आणि बॉलिवूडमध्ये आपली वेगळी ओळख निर्माण करणारी अभिनेत्री रश्मिका मंदानाचा आज आपला 29 वा वाढदिवस साजरा करत आहे. या खास दिवशी तिच्या चाहत्यांसाठी निर्मात्यांनी एक खास सरप्राईज देत तिच्या आगामी 'मैसा' सिनेमातील नवा लूक रिलीज केला आहे.या नव्या पोस्टरमध्ये रश्मिका पूर्णपणे वेगळ्या आणि दमदार अवतारात दिसत आहे. तिच्या चेहऱ्यावर जखमा, धूळ आणि रक्ताचे डाग दिसत असून डोळ्यांत अंगार झळकत आहे. आतापर्यंतच्या तिच्या गोड आणि आकर्षक भूमिकांपेक्षा हा लूक पूर्णपणे वेगळा असून, या सिनेमातील तिची पडद्यावरील प्रतिमा बदलण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.निर्मात्यांनी पोस्टर शेअर करताना खास कॅप्शनही दिले आहे. "तिने तिच्या तेजाने राज्य केले, मोहकतेने मने जिंकली.



# सॅफ फुटबॉल स्पर्धेत भारत उपविजेता

## भारताचा पेनल्टी शूटआऊटमध्ये 4-3 गोलफरकाने पराभव

**महाईन्यूज । मालदिव**

**SAFF U-20 Football Championship स्पर्धेच्या अंतिम सामन्यात बांगलादेशने भारतावर नाट्यमय विजय मिळवत विजेतेपद पटकावले. मालदिव येथे झालेल्या या थरारक सामन्यात दोन्ही संघांनी सुरुवातीपासूनच आक्रमक खेळाचे प्रदर्शन केले. सामन्याच्या निर्धारित वेळेत एकाही संघाला गोल करता आला नाही, त्यामुळे सामना गोलशून्य बरोबरीत राहिला. दोन्ही बाजूंनी उत्कृष्ट बचाव आणि गोलरक्षकांची भक्कम कामगिरी यामुळे गोल करण्याच्या अनेक संधी निष्फळ ठरल्या.**

निर्णयासाठी अखेर पेनल्टी शूटआऊटचा अवलंब करण्यात आला. पेनल्टी शूटआऊटमध्ये भारताच्या मोहम्मद अरबाश, सॅमसन आणि विशाल यादव यांनी अचूक फटके मारत गोल केले. मात्र रिशी सिंगचा निर्णायक ठरू शकणारा फटका बांगलादेशच्या गोलरक्षकाने उत्कृष्ट बचाव करत रोखला. दुसरीकडे बांगलादेशने शांत आणि संयमी खेळ करत मोहम्मद मुरसद अली, चंदन रॉय आणि मोहम्मद युसुफ अली यांनी यशस्वी गोल केले.

सामन्याचा शेवट अत्यंत नाट्यमय ठरला, जेव्हा रोनन सलीवानने चौथा आणि निर्णायक गोल करत बांगलादेशला 4-3 अशा फरकाने विजय मिळवून दिला. या विजयामुळे बांगलादेश संघाने स्पर्धेचे विजेतेपद आपल्या नावावर केले, तर भारतीय संघाला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले.

या संपूर्ण स्पर्धेत ओमांग डोडूम याने उत्कृष्ट कामगिरी करत सर्वोत्कृष्ट खेळाडूचा किताब पटकावला. त्याने एकूण तीन गोल करत आपल्या संघासाठी मोलाचे योगदान दिले. एकूणच हा अंतिम सामना अत्यंत रोमांचक आणि तणावपूर्ण ठरला, ज्यामध्ये दोन्ही संघांनी उच्च दर्जाचा खेळ सादर करत प्रेक्षकांचे मन जिंकले. भारताच्या पराभवानंतरही संघाच्या लढाऊ वृत्तीचे सर्वत्र कौतुक करण्यात आले.




सनरायझर्सला घरच्या मैदानात पराभूत करत लखनौनं फोडला विजयाचा नारळ

# आयपीएलमध्ये खेळू न दिल्याने प्रकरण पोहोचलं कोर्टात

**महाईन्यूज । श्रीलंका**

**श्रीलंका क्रिकेट बोर्डाने वेगवान गोलंदाज न्यूवान तुषाराला आयपीएल स्पर्धेत खेळण्यासाठी एनओसी नाकारली आहे. या निर्णयाने संतापलेल्या तुषाराने श्रीलंका क्रिकेट बोर्डाला कोर्टात खेचलं आहे. नक्की काय आहे हे प्रकरण, एनओसी काय असते, ती कोण देतं आणि हा तिढा का निर्माण झाला?**



लिलावात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने श्रीलंकेच्या न्यूवान तुषाराला १.६ कोटी रुपये खर्चून ताफ्यात समाविष्ट केलं. २०२५ मध्ये आरसीबीने जेतेपद पटकावलं त्या संघाचा तुषारा भाग होता पण त्याला रिटेन करण्यात आलं नव्हतं. लिलावात आरसीबीने पुन्हा त्याला संघात समाविष्ट केलं. कोणत्याही विदेशी खेळाडूला आयपीएलमध्ये सहभागी होऊन खेळण्यासाठी त्याच्या देशाच्या बोर्डाची परवानगी घेणं अनिवार्य असतं. तुषाराच्या संदर्भात श्रीलंका क्रिकेटची नो ऑब्जेक्शन सर्टिफिकेट अर्थात ना हरकत प्रमाणपत्र मिळवणं आवश्यक असतं. तुषाराने एनसोसीकरता तोंडी विचारणा केली आणि लेखी आवेदन दिलं.

३१ वर्षीय तुषारा मध्यमगती वेगवान गोलंदाज आहे. त्याने ३० टी२० सामन्यात श्रीलंकेचं प्रतिनिधित्व केलं आहे. तो जगभरातल्या विविध लीगमध्ये नियमितपणे खेळतो. २०२४ मध्ये तुषारा आयपीएल स्पर्धेतल्या मुंबई इंडियन्स संघाचा भाग होता. २०२५ मध्ये विजेत्या आरसीबी संघाचा तो भाग होता. अवघ्या एका सामन्यात त्याला खेळायची संधी मिळाली होती.

श्रीलंका क्रिकेटने तुषाराला आरसीबीसाठी खेळण्यासाठी एनओसी नाकारली. आयपीएलमध्ये खेळण्यासाठी २ महिने फिट असणं आवश्यक असतं. आयपीएलआधीच्या महिन्यांमध्ये खेळाडू दुखापतग्रस्त होत असल्याचं श्रीलंका क्रिकेटच्या लक्षात आलं. सगळ्यांच्याच दुखापती खोट्या होत्या असं नाही पण सोशल मीडियावर अशा चर्चेला उधाण आलं होतं. फेक इंज्युरी भासवून श्रीलंकेसाठी खेळण्यासाठी अनुपलब्ध व्हायचं आणि एनओसी मिळताच आयपीएल खेळायचं असं काही खेळाडू करत असल्याचंही बोर्डाच्या लक्षात आलं. राष्ट्रीय संघासाठी खेळण्याला प्राधान्य देण्याऐवजी खेळाडू दुसऱ्या देशातल्या लीगला प्राधान्य देणं योग्य नाही अशी श्रीलंका क्रिकेटने भूमिका घेतली.

टी२० वर्ल्डकपमधल्या सुमार प्रदर्शनानंतर माजी खेळाडू प्रमोदया विक्रमासिंघे यांच्या नेतृत्वात नवं फिटनेस धोरण श्रीलंका क्रिकेटने अवलंबलं आहे. एनओसी मिळवण्याकरता ही फिटनेस टेस्ट उत्तीर्ण होणं अनिवार्य करण्यात आलं आहे. या फिटनेस टेस्टमध्ये २ किलोमीटर धावणं, २० मीटर स्प्रिंट, ५-०-५ ॲजिलिटी टेस्ट, स्किनफोल्ड टेस्ट आणि काऊंटर मूव्हमेंट जंप यांचा समावेश आहे. या पाच गोष्टींच्या माध्यमातून खेळाडू जास्तीत जास्त २९ गुण कमावू शकतो. फिटनेस टेस्ट उत्तीर्ण होण्यासाठी खेळाडूने किमान १७ गुण मिळवणं आवश्यक आहे. २०२१ पासून श्रीलंका क्रिकेटने फिटनेस टेस्टकरता याची शिफारस केली होती मात्र त्याची कठोर अंमलबजावणी करण्यात आली नव्हती. मात्र आता याची काटेकोर अंमलबजावणी करण्यात येत आहे. या खटल्यात श्रीलंका क्रिकेटचे अध्यक्ष शमी सिल्व्हा, सचिव बंदुला दिसानायके, खजिनदार सुजीवा गोडियालादा आणि मुख्य कार्यकारी अधिकारी ॲशले डी सिल्व्हा यांना प्रतिवादी करण्यात आलं आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज™
epaper.mahaenews.com
ePaper
। सोमवार ।
दि. 06 एप्रिल 2026।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# पुणे मेट्रो मार्गिका 3 ला गती!

## पीएमआरडीए आयुक्तांचा कडक इशारा; मे 2026 डेडलाईन तय

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पुणे, पिंपरी-चिंचवड आणि आयटीनगरी हिंजवडीला जोडणारी बहुचर्चित पुणे मेट्रो मार्गिका 3 प्रकल्पाचे कामाच्या दिरंगाईबाबत पीएमआरडीए आयुक्तांनी मेट्रोची स्वतंत्र बैठक घेतली. बैठकीत आयुक्तांनी संबंधित अधिकाऱ्यांना कामाची डेडलाईन पाळा, अन्यथा कारवाईस सामोरे जा, असा इशारा दिल्याने मेट्रोचा अभियांत्रिकी विभाग झटापून कामाला लागला आहे.**




माण-हिंजवडी ते शिवाजीनगर या मेट्रो मार्गिका 3 प्रकल्पाच्या दिरंगाईमुळे आयुक्तांनी मार्च महिन्याच्या अखेरी सलग दोन बैठका घेतल्या. प्रत्यक्षात मार्च 2026 मध्ये हे काम पूर्ण होवून मेट्रो धावणे आवश्यक होते; परंतु विविध कारणे आणि कंत्राटदार कंपनीच्या वेळखाऊ प्रक्रियेमुळे हा प्रकल्प लांबला. दरम्यान, या कामात कोणतीही दिरंगाई खपवून घेतली जाणार नाही, अशा शब्दांत पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे (पीएमआरडीए) महानगर आयुक्त डॉ. अभिजित चौधरी यांनी कंत्राटदार कंपनीला सुनावले. तसेच, खरमरीत पत्र पाठवून काम लवकर पूर्ण करा, असे स्पष्ट इशारा दिला आहे. मे 2026 पर्यंत पहिला टप्पा सुरू करण्याची डेडलाईन पाळा, अन्यथा कठोर कारवाईला सामोरे जावे लागेल, असा गर्भित इशाराही त्यांनी दिला.

पुणे आयटीसीटी मेट्रो रेल लि. (पीआयटीसीएमआरएल) द्वारे राबविण्यात येत असलेल्या या प्रकल्पाच्या कामाचा सविस्तर आढावा घेण्यासाठी डॉ. चौधरी यांनी औंध येथील कार्यालयात बैठक घेतली होती. त्यानंतर पुन्हा बुधवारी अभियांत्रिकी विभागाची बैठक घेतली. अतिरिक्त महानगर आयुक्त दीपक सिंगला, पीआयटीसीएमआरएलचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिलकुमार सैनी, पीएमआरडीएच्या मुख्य महानगर अभियंता रिनाज पठाण यांच्यासह अधिकारी उपस्थित होते. दरम्यान, कामाचा आढावा घेण्यासाठी बुधवार (दि. 1) पुन्हा आढावा घेतल्याने अभियांत्रिकी विभाग खडबडून जागा झाला आहे.

> “ प्रकल्पाचा वेळोवेळी आढावा घेत आहे. हा प्रकल्प लवकर सुरू करण्याचा मानस आहे. पहिल्या टप्प्यासाठी मे 2026 ची डेडलाईन पाळण्यासाठी तांत्रिक व इतर कामांना गती देण्याचे निर्देश संबंधित यंत्रणेला दिले आहेत.
>
> - डॉ. अभिजित चौधरी, आयुक्त, पीएमआरडीए.

### ...तर दंडात्मक कारवाई

मेट्रोचे कराराप्रमाणे वाढीव मुदत ही मार्च 2026 पर्यंत होती. मात्र, या कालावधीत काम अपूर्ण आहे. अद्याप मेट्रोच्या स्थानकांचे काम पूर्ण झालेले नाही. परिणामी, करारानुसार मेट्रो कंत्राटदारावर दंडात्मक कारवाई होऊ शकते.

### पहिला टप्पा सुरू करा

मेट्रो मार्गावरील तांत्रिक आणि स्थापत्य (सिव्हिल) कामांच्या सद्यस्थितीची माहिती घेत पहिला टप्पा सुरु करा, असे सुचवले आहे. मेट्रोसाठी लागणारे मनुष्यबळ, तांत्रिक सुविधा आणि प्रलंबित असलेली स्थापत्य कामे तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना आयुक्तांनी दिल्या. शेवटच्या टप्प्यातील कनेक्टिव्हिटीबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. पहिला टप्पा मे 2026 अखेरपर्यंत प्रवाशांसाठी खुला करण्याचे नियोजन आहे. या पहिल्या टप्प्यात 12 स्थानकांचा समावेश राहील.

## देहूगाव इंद्रायणी नदी अस्वच्छतेच्या विळख्यात; वारकऱ्यांची गैरसोय

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**येथील इंद्रायणी नदीच्या घाटावर मोठ्या प्रमाणात जलपर्णी, प्लास्टिकच्या पिशव्या व बाटल्यांचा साठा झाल्याने परिसर अस्वच्छ झाला आहे. त्यामुळे वारकरी, भाविकांना स्नानासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.**

राज्याच्या विविध भागांतून हजारो वारकरी, भाविक दररोज देहूत येत असतात. इंद्रायणीच्या पवित्र पाण्यात स्नान करूनच दर्शनासाठी जाण्याची परंपरा आहे. मात्र, सध्या घाटावरील पायऱ्यांजवळ साठलेल्या जलपर्णीच्या ढीगामुळे भाविकांना स्नान करणे कठीण झाले आहे. पहाटे स्नानासाठी येणाऱ्या अनेकांना पाण्यातील जलपर्णी तसेच काठावर साचलेले ढीग पाहून माघारी फिरावे लागत असल्याचे चित्र दिसून येत आहे.



देहू नगरपंचायतीकडून दरवर्षी जलपर्णी काढण्यासाठी लाखो रुपयांचे टेंडर काढून खर्च केला जात असल्याचे सांगितले जाते. मात्र, प्रत्यक्षात जलपर्णीची परिस्थिती जैसे थी दिसत आहे. नदीकाठावर ठिकठिकाणी काढलेल्या जलपर्णीचे ढीग दिसून येत असल्याने हा खर्च नेमका कुठे जातो?, असा सवाल स्थानिक नागरिक उपस्थित करत आहेत.

अस्वच्छतेमुळे वारकरी, भाविकांची इंद्रायणी नदीत स्नान करण्याची धार्मिक भावना बाधित होत असून, नाराजी व्यक्त केली जात आहे. तसेच, देहू नगरपंचायतीच्या कचऱ्याच्या गाड्यादेखील घाटावरचा लावल्या जातात. त्यामुळे या घाटावर कमालीची दुर्गंधी सुटलेली असते. दशक्रिया विधी किंवा इतर काही कार्यक्रम नदीच्या घाटावर केले जातात. अशावेळी जेवणाच्या पंगतीदेखील बसल्या जातात.

मात्र, या कचऱ्याच्या गाड्यांपासून सुरणार्या दुर्गंधीमुळे अनेकजण काढता पाय घेत आहेत. संबंधित प्रशासनाने तातडीने जलपर्णी काढून टाकावी, काठावर साचलेले ढीग हटवावेत आणि घाट परिसर स्वच्छ ठेवावा, अशी मागणी नागरिक व भाविकांकडून होत आहे. घाट परिसर स्वच्छ झाल्यास वारकरी, भाविकांना पवित्र स्नानाचा आनंद घेता येईल आणि देहूची धार्मिक परंपरा अधिक सन्मानाने जपली जाईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# पिंपरी-चिंचवडला पाण्याचा दिलासा!

## पवना धरण 46% वर; वाढती मागणी, घटता साठा चिंतेचा विषय

महाईन्यूज | पिंपरी-चिंचवड

**पिंपरी: पिंपरी-चिंचवड शहराची तहान भागविणाऱ्या पवना धरणात शनिवारी (दि.4) सकाळी आठपर्यंत 46.55 टक्के पाणीसाठा शिल्लक होता. तीव उन्हामुळे तसेच, पाण्याची मागणी वाढल्याने पाण्याचा साठा वेगात कमी होत आहे. हा साठा पिंपरी-चिंचवड शहराला पावसाळ्यापर्यंत म्हणजे जून महिन्यापर्यंत पुरेल इतका आहे.**



मावळ तालुक्यातील पवनानगर येथील पवना धरणातून पिंपरी-चिंचवड शहराला पाणीपुरवठा केला जातो. महापालिकेकडून पवना नदीवरील रावेत येथील बंधाऱ्यातून दररोज 520 एमएलडी पाणी उचलले जाते. पाण्यावर प्रक्रिया करून पिण्यायोग्य पाणी संपूर्ण शहराला पुरवले जाते. एमआयडीसीकडून 30 एमएलडी पाणी घेऊन शहरातील काही भागास पुरवले जात आहे. आंद्रा धरण पाणी योजनेअंतर्गत निघोजे येथील इंद्रायणी नदी बंधाऱ्यातून दररोज 80 ते 90 एमएलडी पाणी उचलून चिलखी जलशुद्धीकरण केंद्रात शुद्ध करून त्या परिसरात पुरवले जात आहे.

गेल्या सव्वासहा वर्षापासून दोन दिवसातून एकदा पाणीपुरवठा होत आहे. तीव उन्हामुळे पवना धरणातील पाणीसाठा झपाट्याने कमी होत आहे. धरणात शनिवारी (दि.4) सकाळी आठपर्यंत 46.55 टक्के पाणीसाठा होता. त्या धरणातून पिंपरी-चिंचवड शहर, एमआयडीसी, काही नगरपालिका व ग्रामपंचयातीला पाणी दिले जाते. सध्याचा पाणीसाठा पिंपरी-चिंचवड शहराला पावसाळ्यापर्यंत पुरेल इतका आहे.

आंद्रा धरणात सध्या 53.68 टक्के पाणी शिल्लक आहे. त्या योजनेतून निघोजे येथील इंद्रायणी नदी बंधाऱ्यातून 80 ते 90 एमएलडी पाणी दररोज उचलले जाते. तर, भामा आसखेड धरणात 62.37 टक्के पाणीसाठा आहे. अद्याप तो प्रकल्प पूर्ण न झाल्याने शहर 167 एमएलडी पाण्यापासून वंचित आहे. तर, मुळशी धरणात 45.24 टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. तेथील पाणी मुळा नदीस सोडले जाते.


### पाण्याची नासाडी करू नये

शहरातील नागरिकांनी पाण्याची बचत करावी. नासाडी करू नये. पाण्याची गळती होऊ नये, या साठी नादुरुस्त नळ व जोड दुरुस्त करून घ्यावेत. आवार, अंगण, रस्ते, जिने तसेच, वाहन धुण्यासाठी पिण्याचा पाण्याचा वापर करू नये. शिल्लक पाणी दुसऱ्या दिवशी फेकून देऊ नये, असे महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाचे सहशहर अभियंता अजय सूर्यवंशी यांनी सांगितले.

# निगडीतील अग्रसेन महाराजांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे काम रखडले

महाईन्यूज | पिंपरी-चिंचवड

**निगडी येथील भक्ती शक्ती उद्यानाच्या पाठीमागे महात्मा बसवेश्वर व अग्रवाल समाजाचे धर्मगुरू अग्रसेन महाराज यांच्या पूर्णाकृती पुतळ्यांसाठी २ जानेवारी २०२२ रोजी स्थायी समितीत ठराव मंजूर झाला होता. या प्रकल्पासाठी तब्बल ४९ लाख रुपयांचा निधीही मंजूर करण्यात आला होता. मात्र प्रत्यक्षात महात्मा बसवेश्वर यांचा पुतळा व उद्यान विकसित झाले, तर अग्रसेन महाराजांचा पुतळा अजूनही रखडल्याने नाराजी व्यक्त होत आहे.**






या प्रकरणी निगडी टिळक चौक येथे यापूर्वी मोठ्या प्रमाणावर आंदोलन छेडण्यात आले होते. स्थानिक नागरिक, सामाजिक कार्यकर्ते आणि अग्रवाल समाजातील पदाधिकाऱ्यांनी एकत्र येत प्रशासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला होता. या आंदोलनानंतर पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासनाने परिस्थितीची गांभीर्याने दखल घेत, पुढील सहा महिन्यांच्या कालावधीत अग्रसेन महाराजांचा पुतळा उभारणे तसेच त्या परिसरात सुशोभित उद्यान विकसित करण्याचे ठोस आश्वासन दिले होते. या आश्वासनामुळे काही प्रमाणात नागरिकांमध्ये समाधानाची भावना निर्माण झाली होती. मात्र, दिलेल्या मुदतीनंतरही प्रत्यक्षात कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याने आता पुन्हा नाराजीचा सूर उमटू लागला आहे.

गेल्या काही महिन्यांपासून या प्रकल्पाबाबत कोणतीही प्रगती दिसून न आल्याने स्थानिक नागरिक आणि समाजबांधवांमध्ये असंतोष वाढत आहे. प्रशासनाकडून केवळ आश्वासने दिली जात असून प्रत्यक्ष अंमलबजावणी मात्र होत नसल्याचा आरोप केला जात आहे. यामुळे प्रशासनाच्या कार्यपद्धतीवरही प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

भारतीय जनता पक्षाचे कार्यकर्ते सचिन काळभोर यांनी या संपूर्ण प्रकरणावर प्रतिक्रिया देताना प्रशासनावर गंभीर आणि थेट आरोप केले आहेत. त्यांच्या मते, काही राजकीय हस्तक्षेपांमुळेच अग्रसेन महाराजांच्या पुतळा उभारणीच्या कामात अडथळे निर्माण होत आहेत. संबंधित प्रस्तावांना विलंब लावला जात असून, यामुळेच हा प्रकल्प रखडला आहे, असा त्यांचा आरोप आहे. तसेच, त्यांनी तुलना करत नमूद केले की, महात्मा बसवेश्वर यांचा पुतळा हा खासदार श्रीरंग बारणे यांच्या पाठपुराव्यामुळे तुलनेने कमी कालावधीत पूर्ण करण्यात आला. त्यामुळे इच्छाशक्ती आणि पाठपुरावा असेल तर विकासकामे वेगाने पूर्ण होऊ शकतात, हे यावरून स्पष्ट होते, असे त्यांनी ठामपणे सांगितले.

दरम्यान, या मागण्यांसंदर्भात महापौर रवी लांडगे यांना सविस्तर लेखी निवेदन देण्यात आले असून, पुतळा उभारणी व उद्यान विकासाचे काम तातडीने सुरू करून निश्चित कालावधीत पूर्ण करण्याची मागणी करण्यात आली आहे. प्रशासनाने याबाबत स्पष्ट भूमिका घेऊन कामाची ठोस वेळापत्रक जाहीर करावे, अशीही मागणी करण्यात आली आहे. अन्यथा, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आयुक्त कार्यालयासमोर तीव्र आणि व्यापक आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

### समाजात नाराजी वाढण्याची शक्यता..

अग्रवाल समाजाच्या भावना लक्षात घेता प्रशासनाने या विषयावर तातडीने आणि सकारात्मक निर्णय घेणे अत्यंत आवश्यक असल्याचे स्थानिक नागरिकांनी स्पष्ट केले आहे. हा केवळ विकासकामाचा मुद्दा नसून समाजाच्या भावनांशी निगडित प्रश्न असल्याने त्याकडे दुर्लक्ष करता येणार नाही, असेही त्यांनी नमूद केले. अन्यथा, या प्रश्नावरून शहरात मोठ्या प्रमाणात असंतोष निर्माण होऊन आंदोलन अधिक तीव्र आणि व्यापक होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# पिंपरी-चिंचवडमध्ये कचऱ्यावर कारवाई!

## 1.15 कोटींचा दंड वसूल उघड्यावर कचरा टाकणाऱ्यांवर कठोर पावले

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहरात अनेक भागांत उघड्यावर कचरा टाकला जात असल्याने जागोजागी कचऱ्याचे ढीग दृष्टीस पडत असून, अस्वच्छता वाढत आहे. महापालिकेचे सफाई कर्मचारी तेथे नियमितपणे साफसफाई तसेच, सुशोभिकरण करत आहेत. प्रशासनाकडून कोट्यवधी रुपयांचा दंड करूनही, बेशिस्त नागरिकांकडून शहर अस्वच्छ करण्याची सवय काही जात नसल्याचे चित्र आहे.**



इंदूर शहराच्या धर्तीवर शहर कचराकुंडीमुक्त करण्यात आले आहे. शहरातील सर्व कचराकुंड्या हटविण्यात आले आहेत. गल्लोगल्ली घंटागाडी जाऊन घरोघरचा ओला व सुका कचरा गोळा केला जात आहे. ओला व सुका कचरा वेगवेगळा करून देण्याबाबत स्वयंसेवक नागरिकांमध्ये जनजागृतीही करत आहेत.

असे असताना काही बेशिस्त नागरिक कचरा प्लास्टिकच्या पिशवीत भरून मोकळी जागा, रस्त्याकडेला, पदपथ तसेच, नदीपात्र, नाले व गटारीत फेकून देतात. कार, दुचाकीवर येत सुशिक्षित नागरिकही असे प्रकार करत असल्याने स्पष्ट झाले आहे. पकडले जाऊन, दंड होऊ नये म्हणून काही नागरिक रात्रीच्या अंधारात कचरा टाकून पसार होतात. कचरा टाकू नये, असे लिहिलेल्या फलकाखालीच कचरा भरलेल्या पिशव्या फेकला जातात. त्यामुळे मोकाट व भटकी कुत्री तसेच, जनावरे त्यातील खाद्यपदार्थ व खरकट्या अन्न पदार्थांवर जगत असल्याचे दिसत आहे. त्यामुळे सर्व कचरा सर्वत्र पसरून परिसरात अस्वच्छता आणि दुर्गंधी निर्माण होते. तसेच, रोगराई पसरण्याचा धोका आहे. बीआरटी मार्गावरील बस थांब्यावरील हँगिंग लिटर बिन्समध्ये मोठ्या प्रमाणात घरगुती व व्यावसायिक कचरा टाकला जात असल्याने त्या भरून वाहताना दिसल्याचे चित्र जागोजाची दिसते. कचऱ्याचे ते ढीग आरोग्य विभागाकडून ताबडतोब हटवले जात आहेत. तेथे सुशोभिकरण केले जात आहे. या अस्वच्छतेमुळे महापालिका सर्वसाधारण सभेत नगरसेवकांकडून संताप व्यक्त केला जात आहे.

कचऱ्याचे ढीग निर्माण होणाऱ्या शहरातील ठिकाणाचा शोध घेऊन, तेथे महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या पथकाकडून कारवाई केली जात आहे. वर्षभरात बेशिस्त नागरिकांकडून तब्बल 1 कोटी 15 लाख 88 हजार 300 रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. इतक्या मोठ्या प्रमाणात दंड करूनही उघड्यावर कचरा टाकण्याचे प्रमाण काही कमी होत नसल्याचे दिसत आहे. ते प्रमाण पूर्णपणे रोखण्यासाठी कठोर कारवाई करण्याची मागणी पुढे येत आहे.

उघड्यावर कचरा टाकणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई तीव करण्यात येणार आहे. त्यासाठी पथकाची संख्या वाढविण्यात येत असून, तृतीयपंथीयांचेही पथक नेमण्यात येणार आहे. आपले शहर स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी सर्वांचीच आहे. नागरिकांनी उघड्यावर कचरा न टाकता घंडागाडीतच टाकावा. आपण पिंपरी-चिंचवड शहराची दुसऱ्या शहराशी तुलना करतो. त्याप्रमाणे आपले शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी नागरिकांनी पुढे आले पाहिजे. महापालिकेकडून वारंवार आवाहन करूनही काही नागरिक उघड्यावर कचरा फेकतात. त्यांच्यावर कठोर दंडात्मक कारवाई केली जाणार आहे, असे महापालिकेच्या आरोग्य विभागाचे उपायुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांनी सांगितले.

### एक कोटी 15 लाख 88 हजारांचा दंड वसूल

उघड्यावर कचरा टाकण्यावर महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या पथकांकडून कारवाई केली जाते. नागरिकांकडून 100 ते 500 रुपये दंड केला जातो. तसेच, कंपन्या, दुकानदार व व्यावसायिकांना 5 हजार ते 50 हजारांचा दंड केला जातो. एक एप्रिल 2025 ते 31 मार्च 2026 या एका वर्षांच्या कालावधीत एकूण 5 हजार 435 जणांवर कारवाई करण्यात आली आहे. त्यांच्याकडून 1 कोटी 15 लाख 88 हजार 300 रुपयांचा दंड जमा झाला आहे.

# पिंपरी-चिंचवडमध्ये गॅस तुटवड्याचा हॉटेल व्यवसायावर फटका

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**इराण- इस्त्रायल युद्ध परिस्थितीमुळे निर्माण झालेल्या गॅस तुटवड्याचा फटका पिंपरी-चिंचवड शहरातील हॉटेल व्यवसायाला बसू लागला आहे. व्यावसायिक गॅसचा पुरवठा विस्कळीत झाल्याने अनेक हॉटेल्सना तात्पुरते शटर खाली करावे लागले आहे, तर काहींनी केवळ मोजक्याच पदार्थांवर व्यवसाय सुरू ठेवण्याचा मार्ग निवडला आहे. त्यामुळे कामानिमित्त तसेच शिक्षणासाठी घराबाहेर राहणाऱ्यांचे मोठे हाल होत आहेत.**



शहरातील हॉटेल व्यावसायिकांना गॅस सिलिंडरअभावी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. काहींनी पर्यायी उपाय म्हणून इंडक्शन किंवा पारंपरिक चुलींचा वापर सुरू केला असला, तरी त्यातून मोठ्या प्रमाणावर पदार्थ तयार करणे शक्य होत नाही. परिणामी, मेन्यू कार्डमध्ये मोठी कपात करण्यात आली आहे. या परिस्थितीचा थेट परिणाम ग्राहकांवरही दिसून येत आहे. हॉटेलमध्ये जाऊन अपेक्षित पदार्थ न मिळाल्याने अनेकांना परत जावे लागत आहे. गॅस तुटवड्यामुळे खर्चात वाढ झाल्याने हॉटेल चालकांनी दरही वाढवावे आहेत. मात्र, मेन्यूमध्ये दर्शविलेल्या किमती आणि प्रत्यक्ष बिल यामध्ये फरक आढळत असल्याने ग्राहक आणि मालकांमध्ये किरकोळ वाद होत असल्याचेही समोर आले आहे.

गॅसचा पुरवठा सुरळीत होईपर्यंत हीच परिस्थिती राहणार आहे. सरकारने तातडीने उपाययोजना करून व्यावसायिक गॅस सिलिंडर उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. दरम्यान, नागरिकांनीही परिस्थिती समजून घेण्याची गरज असल्याचे आवाहन करण्यात येत आहे. गॅस सिलिंडर पुरवठा पूर्ववत झाल्यानंतरच शहरातील हॉटेल व्यवसाय पुन्हा रुळावर येईल, अशी आशा हॉटेल व्यावसायिकांतून व्यक्त केली जात आहे.

# देहूरोडमध्ये पावसामुळे शेतीचे मोठे नुकसान!

## 20-25 हेक्टर क्षेत्रातील पिकांचे नुकसान; शेतकऱ्यांकडून मदत व कर्जमाफीची मागणी

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**मावळ तालुक्यात सलग तीन दिवस झालेल्या अवकाळी पाऊस आणि गारपिटीने शेतीचे मोठे नुकसान झाले असून, देहूरोड परिसरातील शेतकरी हवालदिल झाले आहेत. अचानक आलेल्या या नैसर्गिक आपत्तीमुळे रब्बी हंगामातील पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.**



अवकाळी पावसाच्या अनपेक्षित आणि जोरदार तडाख्यामुळे देहूरोड तसेच आसपासच्या गावांमधील शेती क्षेत्राला मोठा फटका बसला असून, अंदाजे 20 ते 25 हेक्टर क्षेत्रावरील गहू, ज्वारी, कांदा, विविध भाजीपाला आणि फळपिके मोठ्या प्रमाणावर उद्ध्वस्त झाली आहेत. अनेक शेतकऱ्यांनी कष्टाने जोपासलेली पिके अक्षरशः काही तासांतच जमिनीवर कोसळल्याचे चित्र दिसून आले. विशेषतः काढणीच्या अगदी अंतिम टप्प्यावर आलेली पिके वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसामुळे पूर्णपणे आडवी पडली आहेत, ज्यामुळे शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. काही ठिकाणी पिके इतकी खराब झाली आहेत की ती काढण्यासही योग्य राहिलेली नाहीत.

अनेक भागांमध्ये झालेल्या गारपिटीमुळे पिकांची पाने गळून पडली असून, उभी असलेली पिकेही मोठ्या प्रमाणावर जखमी झाली आहेत. पावसाचे पाणी शेतात साचल्याने पिकांच्या मुळांना मोठा फटका बसला आहे, ज्यामुळे पिकांची वाढ थांबण्याची तसेच उरलेली पिके सडण्याची शक्यता अधिक निर्माण झाली आहे. परिणामी, शेतकऱ्यांसमोर उभे असलेले संकट आणखी गडद झाले आहे. विशेषतः कांदा आणि भाजीपाल्यासारख्या नगदी पिकांचे सर्वाधिक नुकसान झाल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नियोजन पूर्णपणे कोलमडले आहे.

या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांवर दुहेरी नव्हे तर तिहेरी संकट ओढवले आहे. एकीकडे पिकांचे नुकसान झाले आहे, तर दुसरीकडे शेतीसाठी घेतलेले कर्ज फेडण्याची चिंता अधिकच तीव्र झाली आहे. उत्पादन खर्च परत मिळेल का, याबाबतही शंका निर्माण झाली आहे. काही शेतकऱ्यांनी पीकविमा योजनेअंतर्गत नोंदणी केली असली तरी, नुकसानभरपाई वेळेवर मिळेल का, याबाबत अनिश्चितता असल्याने शेतकऱ्यांमध्ये असंतोष आणि अस्वस्थता वाढताना दिसत आहे. विमा कंपन्यांकडून प्रक्रिया विलंबित होण्याची शक्यता व्यक्त होत असल्याने शेतकरी अधिक चिंतेत आहेत.

### कर्जमाफी देण्याची शेतकऱ्यांची मागणी

**शेतकरी वर्गाने शासनाकडे तातडीने आर्थिक मदत, पीकविम्याची त्वरित अंमलबजावणी आणि कर्जमाफीसह दिलासा देण्याची मागणी केली आहे. नैसर्गिक आपत्तीच्या या फटक्यामुळे मावळ तालुक्यातील शेतकऱ्यांवर पुन्हा एकदा संकटाचे सावट आले असून, तातडीच्या मदतीशिवाय त्यांना सावरणे कठीण असल्याचे चित्र निर्माण झाले आहे.**

# भोसरीत बैलगाडा शर्यतींचा थरार; .26 सेकंदात विक्रमी कामगिरी!

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**श्री भैरवनाथ महाराजांच्या उत्सवानिमित्त भोसरी गावठाणातील बैलगाडा घाटात रंगलेल्या पारंपरिक शर्यतींनी यंदा अभूतपूर्व थरार अनुभवायला मिळाला. सकाळपासूनच बैलगाडा शौकिनांनी घाट परिसर गजबजून गेला होता. वेग, ताकद आणि अचूक समन्वय यांची अप्रतिम सांगड घालत स्पर्धकांनी प्रेक्षकांची उत्सुकता शिगेला पोहोचवली.**



भोसरी येथील पारंपरिक बैलगाडा घाटाचे विधिवत पूजन मोठ्या उत्साहात आणि पारंपरिक पद्धतीने पार पडले. या पूजनाचा मान महापौर रवी लांडगे, माजी आमदार विलास लांडे, नगरसेवक ॲड. नितीन लांडगे, सागर गवळी तसेच विराज लांडे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी पुणे जिल्हा बैलगाडा मालक संघटनेचे जिल्हाध्यक्ष भानुदास लांडगे यांच्यासह माजी नगरसेवक पंडित गवळी, विजय फुगे, भानुदास फुगे, शेखर लांडगे, किशोर गव्हाणे, बाजीराव लांडगे, किसन शिंदे, गुलाब लांडगे, ॲड. गणेश फुगे, नामदेव लांडगे, संजय गव्हाणे आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. या पूजन सोहळ्यामुळे घाट परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

यंदाच्या बैलगाडा शर्यतीतही प्रेक्षकांना रोमांचक स्पर्धेचा अनुभव पाहायला मिळाला. चऱ्होली येथील भाऊसाहेब गिलबले आणि गणेश सस्ते यांच्या दमदार बैलजोडीने अवघ्या 12.34 सेकंदात शर्यत पूर्ण करत "घाटाचा राजा" हा बहुमान पटकावला. त्यांच्या या उत्कृष्ट कामगिरीवर उपस्थितांनी टाळ्यांचा कडकडाट करत जल्लोष केला आणि विजेत्यांचा गौरव करण्यात आला. त्यांच्या बैलजोडीची वेग, ताकद आणि समन्वय यांचे सर्वत्र कौतुक करण्यात आले.

फळी फोडीच्या थरारक आणि अत्यंत चुरशीच्या फेरीत हिंदवी वडेवाले आणि समीर दाभाडे यांच्या जुगलबंदीतील बैलगाड्याने 12.57 सेकंदांची वेळ नोंदवत विशेष मान मिळविला. या फेरीत प्रेक्षकांनी श्वास रोखून धरत स्पर्धेचा आनंद लुटला. मात्र, खरी रंगत अंतिम फेरीत पाहायला मिळाली. या निर्णायक फेरीत हिंदवी वडेवाले आणि समीर दाभाडे यांच्या बैलजोडीने अवघ्या 12.26 सेकंदात शर्यत पूर्ण करत प्रथम क्रमांक पटकावला आणि विजेतेपदावर आपला ठसा उमटवला.

स्पर्धेतील इतर निकाल देखील तितकेच चुरशीचे ठरले. गणेश यादव यांच्या बैलजोडीने 12.40 सेकंदात शर्यत पूर्ण करत द्वितीय क्रमांक मिळवला. तर गिलबले–सस्ते यांच्या जोडीने 12.41 सेकंदात तृतीय क्रमांक पटकावला आणि प्रकाश कबाड्डी यांच्या बैलजोडीने 12.47 सेकंदात चौथा क्रमांक मिळवत स्पर्धेत आपली छाप सोडली. प्रत्येक फेरीत स्पर्धकांनी आपापली सर्वोत्तम कामगिरी सादर करत प्रेक्षकांचे मनोरंजन केले.

सकाळी दहा वाजता सुरू झालेल्या या शर्यती सायंकाळी सात वाजेपर्यंत रंगल्या. दिवसभर घाट परिसरात जल्लोषाचे आणि उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. पारंपरिक बैलगाडा शर्यतींचा हा सोहळा म्हणजे ग्रामीण संस्कृतीचा जिवंत वारसा असल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित झाले. या कार्यक्रमाचे सुयोग्य नियोजन आणि व्यवस्थापन करण्यात आयोजकांनी मोठी मेहनत घेतली.